**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## बहिःशाल हिवाळी २०१८ परीक्षेसाठी आवेदनपत्र स्वीकारण्याची अंतीम तिथी ३१ ऑगष्ट
## बहिःशाल विद्यार्थ्यांना अंतीम संधी
## विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी २०१८ परीक्षेकरिता प्रवेशित होवू इच्छिणाऱ्या व परीक्षेस पात्र असणाऱ्या बहिःशाल विद्यार्थ्यांकरिता परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारण्याचा विद्यापीठ प्रशासनाने निर्णय घेतला असून सदर विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे आवश्यक शुल्कासोबत विहित केलेल्या रु. ५०/- प्रतिदिवस याप्रमाणे विलंब शुल्कासह दि. ३१ ऑगष्ट, २०१८ पर्यंत विद्यापीठात स्वीकारण्यात येतील. विद्यापीठाने सत्रपद्धती अभ्यासक्रम लागू केल्याने विद्यार्थ्यांना बहिःशाल म्हणून सत्रपद्धती अभ्यासक्रमामध्ये बसता येत नसल्यामुळे बहिःशाल म्हणून प्रवेशित होवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता विद्यापीठ प्रशासनाने उपलब्ध करुन दिलेल्या अंतीम संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.एच.आर. देशमुख यांनी केले आहे.

तरी विद्यापीठाशी संबंधित सर्व विद्यार्थ्यांना याची नोंद घ्यावयाची असून महाविद्यालयांचे प्राचार्य व शिक्षकांनी याबाबत विद्यार्थ्यांना अवगत करुन द्यावे, असे सर्वसामान्यांच्या माहितीकरिता विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १६/०७/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी